महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२८, राणीचा बाग, जुने सर्किट हाउस जवळ, पुणे ४११००१
दूरध्वनी : ०२० - २६३६२०७१

क्र. आसंप्रस/२०२३-२४/स्पर्धा परीक्षा/ का. ०४/ ३६३४ दि. १३.११.२०२३

## महत्वाची सूचना

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा संपूर्ण तयारी करिता दिल्ली येथील नामवंत खाजगी संस्थेमधून प्रशिक्षण देणे योजना : दिनांक १३ ते १६ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत उमेदवारांनी आपली मूळ कागदपत्रे तपासणी करण्याबाबत ...**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा संपूर्ण तयारी करिता दिल्ली येथील खाजगी संस्थेमधून प्रशिक्षण घेणेसाठी प्रशिक्षणार्थी निवड करण्यासाठी सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची निवड यादी व प्रतीक्षा यादी TRTI च्या संकेतस्थळावर दिनांक ०१.११.२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीतील उमेदवारांनी त्यांचे जमात वैधता प्रमाणपत्र ज्या समिती कार्यालयाकडून निर्गमित केले आहे तेथे जाऊन आपले सर्व मूळ कागदपत्रे तपासणी करण्यासाठी दिनांक ०१ ते ११ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत तपासणी करण्याबाबत TRTI च्या वेबसाईटवर सूचना देण्यात आल्या होत्या मात्र दिनांक ०९ ते ११ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत दिवाळी असल्याने संबधित समिती कार्यालयाला सुट्टी असल्याने त्या कालावधीत उमेदवारांना आपले मूळ कागदपत्रे तपासणी करता आलेले नाही. यासाठी दिनांक १३ ते १६ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत सदर कागदपत्रे तपासणी करण्यासाठी उमेदवारांना या सुचनेद्वारे सूचित करण्यात येते की ज्या उमेदवारांचे मूळ कागदपत्रे अद्याप तपासणी करून झालेले नाहीत, त्यांनी कृपया या कालावधीत आपले सर्व कागदपत्रे तपासणी करून घ्यावे. दिनांक १६.११.२०२३ नंतर ज्या उमेदवारांचे कागदपत्रे तपासली नसतील तर त्यांना दिल्ली प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रवेश दिला जाणार नाही तसेच याबाबत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून कोणत्याही प्रकारची सूट दिली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(पुष्पलता मडावी)
अधिव्याख्याता
स्पर्धा परीक्षा कक्ष